# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ६२/२०१९**

## ''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना''

(महाविद्यालयातील पीएच. डी. अभ्यासक्रमाकरिता)

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागून आर्थिक अडचणींचा सामना न करता पीएच. डी. संशोधन करण्याची संधी प्राप्त होवून त्यातून राष्ट्रपयोगी दर्जेदार संशोधन विद्यार्थ्यांकडून घडावे या हेतूने सन २०१८ मध्ये झालेल्या प्रवेश प्रक्रियेद्वारे महाविद्यालयातील पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या व शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना **''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना''** खालीलप्रमाणे विहित केलेल्या नियम व अटीनुसार जास्तीत जास्त ३ वर्ष कालावधीकरीता रू. ६०००/— प्रतिमहा दराने (प्रत्येक महाविद्यालयातील पीएच. डी. करिता दोन विद्यार्थी किंवा प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या ५०% यापैकी जे कमी असेल ते) सदर शिष्यवृत्ती योजना प्रवेशाच्या दिनांकापासून विशेषबाब म्हणून लागू करण्यात येत आहे.

### <u>शिष्यवृत्ती योजनेसाठीच्या नियम व अटी</u>

१ ''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना'' महाविद्यालयात पीएच.डी. संशोधनासाठी शैक्षणिक वर्ष २०१८—१९ मध्ये नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांपैकी योजनेस पात्र असणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयातील पीएच. डी. करिता दोन विद्यार्थी किंवा प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या ५०% यापैकी जे कमी असेल त्यांना प्रवेश झालेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त ०३ वर्ष कालावधीसाठी रू. ६०००/— प्रतिमहा दराने विहित केलेल्या नियम व अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून लागू करण्यात येईल.

२ सदर शिष्यवृत्ती योजना सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी लागू करून वर्षाअखेर विहित पध्दतीने आढावा घेवून पुढील प्रत्येक एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल.

३ पीएच.डी. अभ्यासक्रम अर्धवट मध्येच सोडून दिल्यास अथवा अभ्यासक्रम पूर्ण करताना इतरत्र पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी केल्यास शिष्यवृत्तीची दिलेली रक्कम विद्यार्थ्यास विद्यापीठाकडे परत जमा करावी लागेल.

४ सदर शिष्यवृत्ती योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

५ विद्यार्थ्यांने इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

६ विद्यार्थी पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी करीत नसावा.

७ प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी त्या त्या महिन्यात ७५ टक्के असणे आवश्यक असून विद्यार्थ्याची हजेरी बायोमॅट्रीक पध्दतीने, मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

८ सदर योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी लागू असलेले इतर सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

९ सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या संपुर्ण कालावधीत आपल्या संशोधनाशी निगडीत दोन कार्यशाळेत सहभाग घेवून तसे प्रमाणपत्र सादर करणे व Refereed Journals मध्ये किमान दोन लेख (Article) प्रसिद्ध करणे बंधनकारक राहील.

१० सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दर सहा महिन्याने प्रगती अहवाल (Progress Report) विहित केलेल्या Research Advisory Committee मार्फत सादर करणे बंधनकारक राहील.

११ फिल्ड वर्क मध्ये केलेले कामकाज मार्गदर्शकाने तपासणे आवश्यक आहे. फिल्डवर्कसाठीच्या रजेचा कालावधी प्रथम मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्याकडून मान्य करून घेणे आवश्यक राहिल, तद्नंतरच सदर कालावधी शिष्यवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येईल. मान्यतेचे पत्र शिष्यवृत्तीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

१२ सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ते नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

१३ निवड प्रक्रिया विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज व संशोधन करीत असलेल्या विषयावरील संक्षिप्त प्रस्ताव मागवून मा. कुलगुरू यांनी गठित केलेल्या निवड समितीव्दारे विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करून मुलाखत घेतल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

१४ महाराष्ट्र शासनाने आरक्षणासंदर्भात विहित केलेले प्रचलित नियम सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी लागू राहतील.

**<u>महाविद्यालयांसाठी सूचना</u>**

- महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांची पडताळणी करून विहित केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी शिफारस करावी.
- योजनेसाठी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयाने BOD Login → Ph.D./M.Phil. Tracking → Confirm J.R.D. Tata Student List या लिंकवर जाऊन Confirm करावे.

सदर शिष्यवृत्ती योजनेससाठी महाविद्यालयाने शिफारस केलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून **"भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना"** या लिंकवर किंवा http://bcud.unipune.ac.in या पोर्टलवरून Ph.D./M.Phil. Tracking या लिंकवर क्लिक करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत. सदर लिंक **दि. ३०/०३/२०१९ पासून दि. ०८/०४/२०१९** पर्यत विद्यार्थ्याना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत खाली नमूद केलेल्या कागदपत्रासह, तसेच मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्या शिफारशीसह **दि. १०/०४/२०१९** पर्यत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }
संदर्भ क्र.: शै. प्रवेश/१०७५ }
दिनांक : २८/०३/२०१९ }

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.